| अर्जदाराचा फोटो |
|---|

नमुना क्र. - १

**'स्वयम् प्रकल्प' परसातील कुक्कुट पालन प्रकल्पाकरिता 'मदर युनिट' निवडीसाठी करावयाचा अर्ज**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नांव | |
| २. | अर्जदाराचा संपूर्ण पत्ता | |
| ३. | अर्जदारांचे वय व जन्म तारीख | |
| ४. | अर्जदारांच्या कुटुंबातील सदस्य संख्या माहिती | पुरुष : महिला : |
| ५. | जात व संवर्ग | |
| ६. | कुक्कुट प्रशिक्षण माहिती (प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी ) | |
| ७. | शैक्षणिक पात्रता | |
| ८. | रहिवासी प्रमाणपत्र | |
| ९. | आधार कार्ड प्रत | |
| १०. | कुक्कुट पालन कामाचा अनुभव तपशील (स्थानिक पशुधन विकास अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे ) | |
| ११. | अर्जदारांकडे मदर युनिटसाठी आवश्यक पक्षीगृह व त्याचे आकार, (मालकीसंबंधीचे अभिलेख सोबत जोडावे ) | |
| १२ | कुक्कुट पालनांसाठी आवश्यक उपकरणे (ब्रुडर, खाद्य-पाण्याची भांडी इ.) तपशीलासह सांख्याकी माहिती | |
| १३ | लाभधारकाचे बँक खाते व शाखा | |

मी, श्री / श्रीमती -------------------------------------- प्रमाणित करतो/ करते की, राज्य शासनाच्या **'स्वयम् प्रकल्प'** परसातील कुक्कुट पालन या प्रकल्पाकरिता मदर युनिट स्थापन करणेसाठी वरील प्रमाणे दिलेली माहिती खरी आहे. या योजनेअंतर्गत योजनेतील अटी व शर्ती नुसार लाभ घेणेस तयार असून, या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. सदरची माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज नामंजूर होण्यास मी पात्र राहिन. योजनेच्या काळात व कालावधी संपल्यानंतर लाभार्थ्यांस शासनाकडे नोकरी मागणेकरिता कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. तसेच बँकेमार्फत घेण्यात येणा-या कर्जफेडीची संपूर्ण जबाबरारी माझी राहील.

स्थळ :

दिनांक :

स्वाक्षरी/-

अर्जदाराचे संपूर्ण नांव व पत्ता

महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग

'मदर युनिट' करीता अर्जदारासाठी कडून घ्यावयाच्या करार पत्राचा नमुना

(रु.२००/- चे स्टॅम्प पेपरवर तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडे नोंदणीकृत करुन)

(शासन निर्णय क्र.कुक्कुट २०१७/प्र.क्र.२७१/पदुम-४, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२९/४/२०१७)

(स्वयम् प्रकल्प)

मी खाली सही करणार श्री./सौ. ................ राहणार ता........जिल्हा............ ..........स्वाक्षरी कर्ता यानुसार स्वखुशीने लिहून देतो की, शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या स्वयम् प्रकल्पाअंतर्गत परसातील कुक्कुट पालनाकरिता मदर युनिटची स्थापना करणे हे काम करु इच्छितो. मला नेमून दिलेल्या ग्रामिण भागात राहून तेथील शेतकरी/कुक्कुट पालक यांचेशी मिळून मिसळून काम करीन. त्यांना समजेल अशा त्यांच्या मायबोलीत / सोप्या भाषेत मी संगोपन केलेल्या कुक्कुट पक्षांची माहिती देईन. या अनुषंगाने कसल्याही प्रकारच्या तक्रारी येणार नाहीत याची पूर्ण दक्षता घेईन.

माझे शिक्षण .........असून वय...... वर्ष....... जात..........संवर्ग............. लिंग.......... आहे. या प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठी माझी निवड जिल्हास्तरीय स्वयम् प्रकल्प समन्वय समिती, जिल्हा- ...... यांनी केली आहे.

१. सदर प्रकल्पाअंतर्गत सन २०१७-१८ ते २०१९-२० या प्रकल्प कालावधीत काम करण्याची याव्दारे लेखी हमी देत आहे. तसेच माझ्या मदर युनिटमध्ये लो इनपुट टेक्नॉलॉजी बर्डस पक्षांचे पालन करुन ४ आठवडे वयाचे पक्षी मदर युनिटला जोडलेल्या जिल्हास्तरीय स्वयम् प्रकल्प समन्वय समितीमार्फत निवडलेल्या लाभार्थीना पुरविण्याचे माझे कर्तव्य राहील.

२. एक दिवशीय पिले हे शासकीय कुक्कुट प्रक्षेत्र अथवा खाजगी कुक्कुट प्रक्षेत्र यांचेकडून निर्धारित मुल्यांनुसार मी विकत घेईन व त्यांची ने-आण करण्याची, वाहतुकीची जबाबदारी माझी स्वतःची राहील.

३. जिल्हास्तरीय प्रकल्प समन्वय समितीने कालबध्द वेळापत्रकाच्या निश्चित केलेल्या आराखडयानुसार लाभार्थ्यांना तीन टप्प्यात पक्षी वाटप करण्याची जबाबदारी माझी राहील. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचेकडून वेळापत्रकाप्रमाणे मदर युनिटधारकाने पक्षी पुरवठा करावयाचा आहे. प्रत्यक्ष पुरवठयाच्या ६० दिवस अगोदर पुरवठा आदेश देण्यात येतील. पुरवठा आदेशात नमूद पक्षी वाटपाच्या तारखेस एका महिन्यापेक्षा जास्त कालावधीचा उशिर झाल्यास दिलेल्या आदेशाच्या किमतीनूसार दंड आकारणी केली जाईल याची जाणीव मला आहे.

४. लाभार्थीना पक्षीवाटप पशुधन विकास अधिकारी विस्तार यांच्या समक्ष विनामुल्य वाटप करेन व त्यानंतर शासन निर्णयात नमुद दराने जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांकडून रक्कम मला देय राहील.

५. पक्षांचे आवश्यक लसीकरण निर्धारित वेळेस करण्याची माझी जबाबदारी राहील.

६. पशुसंवर्धन खात्याचे अधिका-यांना मदर युनिटच्या तपासणीबाबत मी योग्य ते सहकार्य करेन व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करेन.

७. प्रकल्पाच्या काळात व कालावधी संपल्यानंतर मदर युनिटधारकास शासनाकडे नोकरी मागणेकरिता कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची मला जाणीव करून देण्यात आली आहे.

८. या प्रकल्पाच्या शासन निर्णयानुसार देय होणारे अनुदान स्विकारण्यास तयार आहे. याबाबत माझी कोणतीही तक्रार रहाणार नाही.

९. प्रकल्प कालावधी अपरिहार्य कारणाने वाढल्यास याची मुभा व अधिकार शासनास राहील याची मला जाणीव करून देण्यात आली आहे.

उपरोक्त हमीपत्र/करार मी आज दिनांक ......रोजी स्वखुशीने पशुसंर्वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेशी करीत आहे.

लिहून देणार

नांव- पत्ता-

पशुसंवर्धन खात्याचे संबंधित अधिकारी

नांव व पदनाम-

सही/-